RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—ल

वर्ष १, अंक २८]    सोमवार, जून १, २०१५/ज्येष्ठ ११, शके १९३७    [पृष्ठे ६, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक ८७**

## प्राधिकृत प्रकाशन

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जून २०१५

**अधिसूचना**

**कंत्राटी कामगार (नियमन व निमूर्लन) अधिनियम, १९७०.**

क्रमांक सीएलए.१०/२०१४/प्र.क्र.२६४/कामगार-१०.—कंत्राटी कामगार (नियमन व निमूर्लन) अधिनियम, १९७० (१९७० चा ३७) च्या कलम ३५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) नियम, १९७१ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त अधिनियमाच्या कलम ३५ मधील पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहे.

१. या नियमांना, महाराष्ट्र कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) (प्रथम सुधारणा) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) नियम, १९७१ (यापुढे त्याचा उल्लेख " उक्त नियम " असा करण्यात आला आहे), च्या नियम २१ मध्ये पुढील पोट-नियम दाखल करण्यात येत आहे :—

" (१अ) कंत्राटदार प्रत्येक अर्जासोबत, नियम २२ च्या खंड (अ), (ब) व (क) मध्ये नमूद बाबी व नियम २२ मध्ये नमूद इतर बाबी यांच्याशी संबंधित नमुना क्र. IV-A मधील हमीपत्र, जोडील."

३. मुख्य नियमाच्या नियम २३ मध्ये,—

(अ) पोट-नियम (१) च्या ऐवजी खालील पोट-नियम दाखल करण्यात येईल :—

" (१) परिपूर्ण स्वरूपातील अर्ज प्राप्त झाल्यावर, अनुज्ञप्ती अधिकारी, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून कामकाजाच्या **सात** दिवसांत अनुज्ञप्ती मध्ये ज्या काही अटी व शर्ती विनिर्दिष्ट केल्या असतील, त्यांच्या अधीन राहून अनुज्ञप्ती देईल. कामकाजाच्या **सात** दिवसांत अनुज्ञप्ती न दिल्यास, अनुज्ञप्ती मंजूर करण्यात आल्याचे समजण्यात येईल व शुल्काच्या पावतीसह अर्जाच्या पावतीला अनुज्ञप्ती समजले जाईल."

" (१अ) शासन, **राजपत्रात** अधिसूचित केल्याच्या दिनांकापासून, अर्ज सादर करण्यास व अनुज्ञप्ती प्रदान करणे अथवा त्याचे नुतनीकरण करणे यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देईल जेणे करून संगणक निर्मित अनुज्ञप्ती प्रमाणपत्र प्रदान करणे शक्य होईल. ऑनलाईन संगणक प्रणाली अशी विकसित करण्यात येईल की, जर पोट-नियम (१) मध्ये नमूद केलेल्या कालावधीत अर्ज अस्वीकृत केल्याबाबतचे आदेश कळविले न गेल्यास, शुल्काच्या पावतीसह ऑनलाईन अर्जाच्या पावतीला उक्त नियमाच्या प्रयोजनार्थ अनुज्ञप्ती समजले जाईल."

(ब) पोट-नियम (२) च्या ऐवजी खालील पोट-नियम दाखल करण्यात येईल :—

" (२) अनुज्ञप्ती निर्गमित केल्यानंतर अथवा जेथे अनुज्ञप्ती दिली असल्याचे समजण्यात आले आहे, अशा वेळी जर अनुज्ञप्ती अधिकाऱ्याची खात्री झाली अन्यथा करून याबाबतीत काही संदर्भ प्राप्त झाले आहे, की,—

(अ) अनुज्ञप्तीमधील कोणत्याही अटीचे उल्लंघन अथवा नियम २१ च्या पोट-नियम (१अ) अन्वये दिलेल्या हमीपत्रातील अटींचे उल्लंघन झाले आहे, अथवा

(ब) नियम १४ मधील पोट-नियम (१) अथवा (२) अंतर्गत कार्यवाही करण्याबाबत परिस्थिती निर्माण झाली आहे,

अनुज्ञप्ती अधिकारी, अनुज्ञप्ती धारकास कारणे दाखवण्याची संधी देवून अधिनियमातील तरतुदीनुसार अशी अनुज्ञप्ती मागे घेईल अथवा निलंबित करील अथवा त्या सुधारणा करील."

४. मुख्य नियमाच्या नियम २४ मध्ये,—

(१) अंक " १०० " ऐवजी अंक " ५०० " दाखल करण्यात येईल.

(२) परंतुकातील अंक " ५० " ऐवजी अंक " २५० " दाखल करण्यात येईल.

५. मुख्य नियमातील नियम २५ च्या पोट-नियम (२) मधील खंड (८) मध्ये " प्रत्येक कंत्राटी कामाच्या पुर्णत्वानंतर " या शब्दानंतर " कंत्राटी कामगारांच्या यादीसह " हे शब्द दाखल करण्यात येतील.

६. मुख्य नियमाच्या नियम २६ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येतील :—

" २६. शुल्क,—(१) कलम ७ अंतर्गत मंजूर करावयाच्या नोंदणी प्रमाणपत्रासाठी रु. ५००० शुल्क अदा करावे लागेल.

(२) कलम १२ अंतर्गत अनुज्ञप्तीची मंजुरी अथवा त्याचे नुतनीकरण यासाठी रु. ५००० प्रति वर्ष इतके शुल्क अदा करावे लागेल. "

७. मुख्य नियमाच्या नियम २७ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

" २७. अनुज्ञप्ती वैधता.—नियम २३ अंतर्गत मंजुर केलेली प्रत्येक अनुज्ञप्ती अथवा नियम २९ अंतर्गत मुतणीकरण केलेली अनुज्ञप्ती कार्यरत राहील जोपर्यंत,—

(अ) अनुज्ञप्ती अधिकाऱ्याकडून ती रद्द अथवा निलंबित अथवा सुधारित होत नाही.

अथवा

(ब) मुख्य मालकाने कंत्राटदारास नियुक्त केले आहे वा नियुक्ती प्रस्तावित केली आहे आणि कंत्राटदार नियम २६ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेले शुल्क प्रति वर्ष अदा करीत आहे. ".

८. मुख्य नियमाच्या नियम २९ मध्ये पोट-कलम (१) ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल. :—

" (१) अनुज्ञप्ती समाप्त होण्याच्या दिनांकापूर्वी ६० दिवस अगोदर प्रत्येक कंत्राटादार अनुज्ञप्ती अधिकाऱ्याकडे अनुज्ञप्तीच्या नुतनीकरणासाठी नमुना क्रमांक ७ तीन प्रतीत सादर करेल. परिपुर्ण स्वरूपातील अर्ज प्राप्त झाल्यावर, अनुज्ञप्ती अधिकारी, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून कामकाजाच्या **सात** दिवसांत अनुज्ञप्ती मध्ये ज्या काही अटी व शर्ती विनिर्दिष्ट केल्या असतील, त्यांच्या अधीन राहून अनुज्ञप्ती नुतनीकरण करेल. कामकाजाच्या **सात** दिवसांत अनुज्ञप्तीचे नुतनीकरण न केल्यास, अनुज्ञप्तीचे नुतनीकरण मंजूर करण्यात आल्याचे समजण्यात येईल व शुल्काच्या पावतीसह अर्जाच्या पावतीला अनुज्ञप्तीचे नुतनीकरण समजले जाईल. "

" (१अ) नियम २३ च्या पोट-नियम (१अ) आणि (२) मधील तरतूद

अनुज्ञप्तीच्या नुतनीकरणासंदर्भात आवश्यक ते फेरफार करून लागू राहतील.

९. मुख्य नियमामध्ये जोडलेल्या नमुना क्र. IV नंतर पुढील नमुना दाखल करण्यात येत आहे.

**“ नमुना क्र. IV-A**

[नियम २१ (१अ) पहा]

**हमीपत्राचा नमुना**

मी, ——————————————— कंत्राटदार, ———————————— या आस्थापनेतील कंत्राटी तत्वावरील काम अंमलात आणण्यासाठी नियुक्त करण्यात आलो असून याद्वारे घोषित करतो की,—

(अ) १. मी अल्पवयीन नाही ;

२. मी मानसिकदृष्ट्या विकृत नाही आणि सक्षम न्यायालयाने तसे घोषित केलेले नाही ;

३. मी दिवाळखोर नाही ; अथवा

४. शासनाच्या मतानुसार नैतिक अधःपतन होईल अशा कोणत्याही गुन्ह्यात (अर्ज सादर करण्यापूर्वी लगतच्या मागील पाच वर्षात) मी दोषी ठरलेलो नाही ;

(ब) आस्थापनेत ज्या विशिष्ट कामसाठी मी कंत्राटदार म्हणून अर्ज सादर केला आहे त्या कामासाठी कंत्राटी कामगार पद्धत निर्मुलनासंबंधी शासनाचे कोणतेही आदेश, निवाडा अथवा समझोता नाही ;

(क) अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून लगतच्या मागील तीन वर्षात, अधिनियमातील कलम १४ मधील पोट-कलम (१) अंतर्गत, माझ्याशी संबंधित कोणतेही आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत.

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची (कंत्राटदार) स्वाक्षरी. ”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बाळासाहेब कोळसे,**
शासनाचे सह सचिव.

In pursuance of clause (3) of Article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Government Notification, Industries, Energy and Labour Department No. CLA-10/2014/C.R.264/Lab.-10, dated 1st June 2015 is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

BALASAHEB KOLASE,
Joint Secretary to Government.

**INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT**

Mumbai 400 032, dated the 1st June 2015

*NOTIFICATION*

THE CONTRACT LABOUR (REGULATION AND ABOLITION) ACT, 1970.

No. CLA-10/2014/C.R.264/Lab-10.— In exercise of the powers conferred by section 35 of the Contract Labour (Regulation and Abolition) Act, 1970 (37 of 1970), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Contract Labour (Regulation and Abolition) Rules, 1971, the same having been previously published as required by sub-section (*1*) of section 35 of the said Act, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Contract Labour (Regulation and Abolition) (First Amendment) Rules, 2015.

2. In rule 21 of the Maharashtra Contract Labour (Regulation and Abolition) Rules, 1971 (hereinafter referred to as "the principal Rules"), the following sub-rule shall be added, namely :—

"(*1A*) Every application shall be accompanied by an undertaking in Form No. IV-A by the Contractor regarding the matters mentioned in clauses (*a*), (*b*) and (*c*) of rule 22 and other matter mentioned in rule 22.".

3. In rule 23 of the principal Rules,—

(*a*) for sub rule (*1*), the following sub-rules shall be substituted, namely :—

" (*1*) On receipt of an application completed in all respect, the licensing officer shall issue a licence within seven working days, from the date of receipt of an application subject to the terms and conditions as may be specified in the licence. If the licence is not issued within the said seven working days, it shall be deemed to have been granted and the copy of the receipt of an application with copy of payment of fees shall be treated as licence.

(*1A*) The Government shall, from the date as may be notified by the Government in the *Official Gazette,* make available online the facility for application and issuance of registration of renewal certificate so that computer generated licence can be issued online. Online processing software shall be so designed to ensure that if order of rejecting the application is not communicated within the period stated in sub-rule (*1*), the receipt of online application attached with the copy of payment of fees online shall be deemed to be the licence for the purposes of the said Act.";

(*b*) for sub-rule (*2*), the following sub-rule shall be substituted, namely :—

"(*2*) After issuance of a licence or where the licence is deemed to have been issued, if licensing officer is satisfied, either on a reference made to him in this behalf or otherwise, that,—

(*a*) there is breach of any condition mentioned in the licence or in undertaking given as per sub-rule (*1A*) of the rule 21 ; or

(*b*) there is reason to take action under sub-section (*1*) or (*2*) of section 14,

the licensing officer may, after giving the holder of licence an opportunity of showing cause, revoke or suspend or amend the licence as per the provision of the Act.".

4. In the rule 24 of principal Rules,—

(*i*) for the figures "100" the figures "500" shall be substituted ;

(*ii*) in the proviso, for the figures "50" the figures "250" shall be substitued.

5. In rule 25 of principal Rules, in sub-rules (*2*), in clause (*viii*), after the words "completion of each contract works" the words "with list of contract workers" shall be added at the end.

6. For rule 26 of the principal Rules, the following rules shall be substituted, namely :—

"*26. Fees.*— (1) The fees to be paid for the grant of a certificate of registration under section 7 shall be Rs. 5,000.

(2) The fees to be paid for the grant or renewal of a licence under section 12 shall be Rs. 5,000 per annum.".

7. For rule 27 of the principal Rules, the following rules shall be substituted, namely :—

"*27. Validity of Licence.*— Every licence granted under rule 23 or renewed under rule 29 shall remain in force till,—

(*a*) it is not revoked or suspended or amended by the licensing officer ;

or

(*b*) the principal employer engages or proposes to engage contractor and contractor pays the fees per annum as prescribed in sub-rule (*2*) of rule 26.".

8. In rule 29 of principal Rules, for sub-rule (*1*), the following sub-rules shall be substituted, namely :—

"(*1*) Every contractor shall apply to the licensing officer for renewal of a licence in Form No. VII in triplicate not less than 60 days before the date on which the licence expires. On receipt of an application completed in all respect, the licensing officer shall renew the licence within seven working days from the date of receipt of an application, subject to the terms and conditions as may be specified in the licence. If the licence is not renewed within the said seven working days, the licence shall be deemed to have been renewed and the copy of the receipt of an application for renewal with copy of payment of fees thereof shall be treated as renewel of licence.

(*1A*) The provision of sub-rule (*1A*) and (*2*) of rule 23 shall apply, *mutatis mutandis,* for the renewal of licence.".

9. After Form No. IV appended to the principal Rules, the following shall be inserted, namely :—

**"Form IV-A**

[*See* Rule 21 (1A)]

*Form fo undertaking*

I, ——————————————Contractor, Appointed to carry out the contract work in —————————————————— establishment, hereby declare that,—

(*a*) (*i*) I am not a minor ;

(*ii*) I am not of unsound mind and stand so declared by the competent court ;

(*iii*) I am not an insolvent ; or

(*iv*) I have not been convicted (at any time during the period of five years immediately preceding the date of application) of an offence, which, in the opinion of the Government, involves moral turpitude ;

(*b*) There is no order of the Government or an award or settlement for the abolition of contract labour in respect of which particular type of work in the establishment for which I have applied as contractor ;

(*c*) There is no order made in my respect under sub-section (*1*) of section 14 within the period of three years immediately preceding the date of application.

Place :

Date : Signature of the Applicant (Contractor)."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

BALASAHEB KOLASE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.